## यात्रास्थळाच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम

**योजनेचे स्वरुप :** राज्यस्तर (योजनांतर्गत)

**योजनेबाबतचा तपशील :**

ग्रामीण भागातील तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी दिवसेंदिवस देवदर्शना साठी भाविक / यात्रेकरुंची संख्या मोठ्या प्रमाणांत सातत्याने वाढत आहे. अशा ठिकाणी भाविक / यात्रेकरु यांना विविध नागरी सोयी-सुविधा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना (उदा. ग्राम पंचायत) त्यांच्या तुटपुंज्या उत्पन्नामुळे पुरविणे शक्य होत नाही. म्हणून शासनाने ग्रामीण भागातील तिर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान देण्याची योजना सुरु केली. या योजनेंतर्गत गावातील तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी अंतर्गत रस्ते, पाणी पुरवठ्याची व्यवस्था करणे, सार्वजनिक स्वच्छतागृहे, वाहनतळ, यात्रीनिवास, रस्त्यावरील दिवाबत्ती आणि बाग बगीचा, संरक्षक भिंत इत्यादी सुविधा निर्माण केल्या जातात.

२. ग्रामीण तिर्थक्षेत्रांची वर्गवारी खालील तीन प्रकारात मोडते :-

(१) "अ" वर्ग - राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय महत्वाची ठिकाणे आणि ज्यासाठी केंद्र शासनाकडून तसेच इतर राष्ट्रांकडून सहायक अनुदान प्राप्त होते.

(२) "ब" वर्ग - राज्य स्तरावरुन निधी उपलब्ध करुन देण्यात येणारी तिर्थक्षेत्रे.

(३) "क" वर्ग - स्थानिक पातळीवर प्रसिध्द असलेली तिर्थक्षेत्रे. ज्याला जिल्हा नियोजन व विकास समिती नियतव्यय मंजूर करते.

३. "क" वर्ग तीर्थक्षेत्रांसाठी जिल्हास्तरावरुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचे अधिकार संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांना दिलेले आहेत व राज्यस्तरावरुन तिर्थक्षेत्रांना "ब" वर्ग दर्जा देण्यासाठी सचिव (ग्रामविकास) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. राज्यस्तरावरुन एका तिर्थक्षेत्रास रु.१.०० कोटी एवढया निधीच्या मर्यादेत विकास कामांसाठी निधी वितरीत केला जातो. तिर्थक्षेत्रांना "ब" वर्ग दर्जा देण्यासाठी खालीलप्रमाण निकष ठरविण्यात आले आहेत.

१. विहीत प्रपत्रात प्रस्ताव, तीर्थक्षेत्राचे महात्म्य व तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी वर्षभरात साजरे करण्यात येणारे उत्सव, सण,कार्यक्रम इ.
२. तीर्थक्षेत्रास भेट देणाया- भाविकांच्या उपस्थितीबाबतचे विहीत नमुन्यातील पोलीस अधिक्षक, जळगांव यांचे प्रमाणपत्र (सही शिक्क्यासह शासनाच्या दि.१९/११/२०११ च्या पत्रासोबतच्या विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र)
३. सदर तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी करावयाच्या कामांसाठी जागा ग्रामपंचायत/ जिल्हा परिषदेच्या नांवे असल्याचा ७/१२ उतारा किंवा नमुना ८ (मूळ प्रत) तसेच देवस्थानच्या नांवे जागा असल्यास रु.१००/- स्टॅम्प पेपरवर सदर जागा ग्रामपंचायत/ जिल्हापरिषद यांच्या नांवे हस्तांतरीत केल्याबाबतचे समंतीपत्र सादर करावे.
४. देवस्थान व कामांचा सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेला कामाचा स्थळदर्शक नकाशा (Site Plan )
५. सद्यस्थितीत: तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी असलेल्या पायाभूत सुविधा जसे शौचालय, पार्कींग इ.

६. विकास कामांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली जमीन वनक्षेत्रात येत नसल्याचे प्रमाणपत्र.

७. देखभालदुरुस्ती- देवस्थानमार्फत करण्यात येणार असल्याचे प्रमाणपत्र.

८. सदर तीर्थक्षेत्रास "क" वर्ग दर्जा असल्याचा पुरावा (जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीचे ईतिवृत्त/ पत

९. अंदाजपत्रकानुसार घेण्यात येणारी कामे कोणत्याही अन्य योजनेतून मंजूर अथवा प्रस्तावित नसल्या प्रमाणपत्र

वरील कागदपत्रांसह मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यामार्फत प्रस्ताव शासनास सा करावा लागतो.

**चालू वर्षासाठी उपलब्ध तरतूद :**

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाकरिता राज्यस्तरावर रु.३२००.०० लाख इतका निधी अर्थसंकलि करण्यात आला आहे.

*****